Publication: Sakal
Date: 21/4/2018
Page: 3
Column: 1

सकाळ
रविवार, २१ एप्रिल २०१९



मुंबई : 'अदानी इलेक्ट्रिसिटी'च्या अग्निसुरक्षा सप्ताहात अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी सुरक्षा रक्षकांना आग विझवण्यासंबंधातील प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.

## 'अदानी इलेक्ट्रिसिटी'चा अग्निसुरक्षा सप्ताह

मानखुर्द (बातमीदार) : अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) तर्फे नुकताच अग्निसुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला. त्यामध्ये घर आणि व्यवसायाच्या ठिकाणी आगीसारख्या अप्रिय घटना टाळण्यासाठी जनजागृती कार्यशाळा घेण्यात आल्या. या कार्यशाळांमध्ये अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी 'एईएमएल'च्या सात हजार कर्मचारी व ग्राहकांशी संवाद साधला आणि अग्निसुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. कांदिवली, मागाठणे, भाईंदर व टिळकनगरमधील कार्यालयांतील सुरक्षा रक्षकांना आग विझवण्यासंबंधातील प्रत्यक्ष प्रशिक्षणही देण्यात आले. एक संस्था म्हणून सुरक्षा हे आमचे मूळ ध्येय आहे आणि अग्निसुरक्षेसंदर्भातील जनजागृतीसाठी आम्हाला अग्निशमन दलाचे सहकार्य लाभणे हा आमचा सन्मान आहे, अशी माहिती 'एईएमएल'च्या प्रवक्त्यांनी कार्यशाळेदरम्यान दिली.